**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एस-विभाग, मुंबई.**
**यांचे कार्यालय**
**कक्ष क्रमांक** २०२, दुसरा मजला कोकण भवन, नवी मुंबई. ४०० ६१४.
दुरध्वनी क्रं. ०२२ - २७५६५०८२

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अन्वये आदेश

जा.क्र.मुंबई/सनि/एस-वि/बी-४/ 1016 /सन-२०१७
दिनांक 27 / 3 /२०१७

वाचावे :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ मधील तरतुदी

२) मा.राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण ,महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाकडील दिनांक १३/११/२०१४ रोजीचे प्राधिकृत अधिकारी नियुक्ती आदेश

३) या कार्यालयास दिनांक २७/१/२०१७ रोजी सादर केलेला अहवाल

ज्याअर्थी सन हाईटस को ऑप हौसिंग सोसा लि, सी टी एस नं ४ डी/२ हरीयाली व्हीलेज,ऑफ आदी शंकराचार्य मार्ग, गांधी नगर,पवई ,मुंबई -७६ ( या संस्थेच्या नावाने वाचावे ) ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था आहे आणि,

ज्याअर्थी सदरची गृहनिर्माण संस्था ही सहकारी कायदा व मंजूर उपविधीनुसार नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था असल्याने तिचे कामकाज हे सहकारी कायदा व मंजूर उपविधी व सहकार विभाग महाराष्ट्र शासन यांजकडून वेळोवेळी पारीत परीपत्रकानुसार कामकाज करणे बंधनकारक आहे .आणि,

ज्याअर्थी प्राधिकृत अधिकारी श्रीमती पी एन सुर्वे यांनी या कार्यालयास दिनांक १८/१/२०१५ रोजी निवडणुक अहवाल सादर केलेला आहे आणि,

१)श्री दिवाण मनीष वेध

२)श्री माखीजा राजेश

३)श्री साहरन शामलाल

४)श्री शेटटी शेखर

५)श्री शर्मा दिवेश

६)श्री शिव सुधर्म

७)श्री श्रीवास्तव बसंत

८)श्री सिंग पवन

९)श्री गुप्ता राजेश

Scanned by CamScanner

१०)श्रीमती पपानी सोना

११)श्रीमती शर्मा श्वेता

**ज्याअर्थी तक्रारदार श्रीमती लीना माकानी यांनी संस्थेव्दारे** प्राप्त पदाधिका-यांची यादीसह **या कार्यालयास केलेली तक्रार तपासली** असता प्राधिकरणामार्फत घेण्यात आलेल्या निवडणुकीमधील **फक्त ७ पदाधिकारी सध्या समिती पदावर** असल्याचे निदर्शनास आलेले आहे आणि,

ज्याअर्थी आपण दिनांक २७/१/२०१७ च्या पत्रावरुन असे निदर्शनास येते की १)श्री दिवाण वेद २) श्री राजेश मखीजा ३) श्री श्रीवास्तव बंसन ४) श्री सोना पापानी या ४ सदस्याऐवजी आपण इतर सदस्यांची परस्पर पदाधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे .आणि,

ज्याअर्थी सहकारी निवडणुक नियमानुसार प्राधिकरणामार्फत निवडणुक घेणे अनिवार्य असून संस्थेला परस्पर पदाधिकारी कमिटीमध्ये निवडून घेता येत नाही .आणि,

ज्याअर्थी आपल्या समितीची पदाधिकारी संख्या १३ एवढी असून कमिटीवर केवळ ७ पदाधिकारी कार्यरत असल्यामुळे ९७ व्या घटना दुरुस्तीनुसार कमिटी कोरम संस्थेतील सभासद संख्या १०० पेक्षा जास्त असल्याने कमीत कमी ८ सदस्य असणे बंधनकारक असताना कमी सदस्य कमिटीवर कामकाज करीत असल्याचे या कार्यालयाचे निदर्शनास आलेले आहे तसेच सध्या कार्यरत समिती अनधिकृतपणे कामकाज करीत असून ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार निवडणुक नियमांचे पालन करीत नसल्याची या कार्यालयाची खात्री झाल्याने संस्थेच्या व सभासदांच्या हितास बाधा निर्माण होण्याची शक्यता असल्याने कार्यरत व्यवस्थापक समिती बरखास्त करुन संस्थेचे दैनंदिन कामकाज व नवीन व्यवस्थापक समितीची निवडणुक प्रक्रियाबाबत कार्यवाही करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. अशी माझी खात्री झाल्याने खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.आणि.

:- आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये मला प्राप्त अधिकारान्वये मी संध्या बावनकुळे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था एस विभाग, मुंबई व्दारा सन हाईटस को ऑप हौसिंग सोसा लि, सी टी एस नं ४ डी/२ हरीयाली व्हीलेज,ऑफ आदी शंकराचार्य मार्ग, गांधी नगर,पवई ,मुंबई -७६ या संस्थेची कार्यरत व्यवस्थापक समिती बरखास्त करुन श्री आनंद म्होळे यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे .

सदरचा आदेश आज दिनांक २७/३/२०१७ रोजी माझ्या सही व या कार्यालयाच्या मुद्रेसह पारीत करण्यात येत आहे .

(संध्या बावनकुळे)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, एस विभाग, मुंबई

प्रत माहितीकरीता रवाना :-

१) चेअरमन/सेक्रेटरी, सन हाईटस को ऑप हौसिंग सोसा लि, सी टी एस नं ४ डी/२ हरीयाली व्हीलेज,ऑफ आदी शंकराचार्य मार्ग, गांधी नगर,पवई ,मुंबई -७६

Scanned by CamScanner

२/- आपणास कळविण्यात येते की आपण संस्थेच्या संपुर्ण दप्तराचा व मालमत्तेचा ताबा प्राधिकृत अधिकारी यांना देण्यात यावा.

**२) श्री आनंद पुंडलिक म्होळे, प्राधिकृत अधिकारी**

**३) शाखाधिकारी** ,मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि/ महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि शाखा -

-----------

प्रत माहितीस्तव :-

श्रीमती लीना माकानी ,७०२ सन हाईटस को ऑप हौसिंग सोसा लि, सी टी एस नं ४ डी/२ हरीयाली व्हीलेज,ऑफ आदी शंकराचार्य मार्ग, गांधी नगर,पवई ,मुंबई -७६

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, एस विभाग, मुंबई

Scanned by CamScanner